# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

**प्रश्नपुस्तिका क्र.** / **BOOKLET No.** **GS2022**

**Total Que. : 100**
**Marks : 100**
**Time : 60 min**

**Mob. No. 9923262977**


**Date :09/01/2022**

**संयुक्त (पूर्व) सराव परिक्षा - 2022**
**विषय : — सामान्य अध्ययन [001]**
**पेपर क्र. (१)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा–क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच “उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणता अंक येईल ? जर CABLE = ३१२१२५, तर RADIO = ?

१) १८१४८१५ २) १८१४९१५ ३) १७२४९१६ ४) १८२५८१५

२. ३ फेब्रुवारी २००४ रोजी मंगळवार होता, तर खालीलपैकी त्या महिन्यात कोणता वार ५ वेळा येईल ?

१) रविवार २) शुक्रवार ३) सोमवार ४) शनिवार

३. अंजली व संध्या यांच्या आजच्या वयांचे गुणोत्तर ६:५ आहे. दोन वर्षापूर्वी त्यांच्या वयाचे गुणोत्तर ५:४ होते, तर अंजलीचे आजचे वय किती ?

१) १० वर्षे २) १२ वर्षे ३) १५ वर्षे ४) १८ वर्षे

४. विधाने : अ) काही शेळया मेंढया असतात

ब) सर्व मेंढया हया घोडे असतात

अनुमाने : I) सर्व घोडे हे मेंढया असतात

II) काही घोडे हे शेळया असतात

III) काही शेळया हया घोडे असतात

IV) एकही शेळी ही घोडा नाही

१) फक्त i व iii अनुमाने निघतात २) फक्त i व ii अनुमाने निघतात

३) फक्त एकतर ii किंवा iii अनुमान निघते ४) एकही अनुमान निघत नाही

५. प्रतिक फोटोतील व्यक्तीकडे बोट दाखवत म्हणाला “हिच्या मामाची एकुलती एक बहीण ही माझी आई लागते” तर फोटोतील व्यक्ती प्रतिकची कोण ?

१) मामे बहीण २) आते बहीण ३) मावस बहीण ४) बहीण


६. ८९ : ८५ : : ६७ : ?

१) ७१ २) ६४ ३) ६५ ४) ६१

७. अखिलेश स्वत:च्या घरून निघून शाळेत जाताना प्रथम पूर्वेकडे सरळ १०० मी. जातो. त्याच स्थितीत तो एकदा काटकोनात उजवीकडे वळून सरळ ५० मी. जातो. नंतर तो एकदा काटकोनात डावीकडे वळून सरळ १०० मी. चालल्यावर शाळेत पोहोचतो, तर अखिलेशचे घर शाळेच्या कोणत्या दिशेला आहे ?

१) आग्नेय २) ईशान्य ३) वायव्य ४) नैऋत्य

८. सोबतच्या आकृतीत त्रिकोणांची एकूण संख्या किती ?




१) १२ २) २४ ३) १६ ४) २८

९. जर PUNE = P२१N५, MUMBAI = M२१M२A९, तर BANGATRE = ?


१) २A१४G१२०१८E २) B२१N१४G१२०१८E ३) B२१N१४G१२०१८५ ४) B१N७A२०R५

१०.  असलेल्या पृष्ठाच्या विरूध्द पृष्ठावर कोणते चिन्ह येईल ?



१) △ २) ⊗ ३) ○ ४) □

११. पुढील आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




१) १६ २) १५ ३) ३० ४) १८

www.spandancareers.org

१२. एका परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्याला ३०% गुण लागतात. एका विद्यार्थ्याने २५% गुण मिळविले व तो ४० गुणांनी अनुत्तीर्ण झाला तर ती परिक्षा किती गुणांची होती ?

१) १५०० २) ५०० ३) ८०० ४) १०००

---

१३. $3 \div \left[(8-5) \div \{(4-2) \div \left(2+\frac{8}{13}\right)\}\right] = ?$

१) $\frac{17}{13}$ २) $\frac{68}{13}$ ३) $\frac{13}{17}$ ४) $\frac{13}{68}$

---

१४. एक वस्तू ४८० रूपयास विकल्याने विक्रीच्या १/६ नफा झाला तर त्या व्यवहारात शेकडा नफा किती झाला ?

१) २० २) २५ ३) ३० ४) यापैकी एकही नाही

---

१५. एक स्त्रीने ८ तासात केलेले काम हे पुरूषाने ६ तासात केलेल्या कामाबरोबर आहे व तेच काम मुलांनी १२ तासात केलेल्या कामाबरोबर आहे. जर एक काम ९ पुरूष दररोज ६ तास काम करून ६ दिवसात संपवितात तर तेच काम १२ पुरूष १२ स्त्रिया व १२ मुले मिळून दररोज ८ तास काम करून किती दिवसात संपवतील ?

१) $2\frac{1}{2}$ दिवस २) $3\frac{2}{3}$ दिवस ३) ३ दिवस ४) $1\frac{1}{2}$ दिवस

---

१६. योग्य जोडया लावा (राष्ट्रीय उद्यान व ठिकाण)

१) नागरहोल राष्ट्रीय उद्यान i) शहादोल

२) बांधवगड राष्ट्रीय उद्यान ii) चमोली गढवाल

३) खांगचेंद झोंगा राष्ट्रीय उद्यान iii) कुर्ग

४) पुष्पावती राष्ट्रीय उद्यान iv) गंगटोक

१) i ii iii iv

२) ii iii iv i

३) iii i iv ii

४) iv ii iii i

---

१७. खालील पर्यायातनू अयोग्य पर्याय निवडा ?

१) सौरऊर्जेत अग्रेसर असलेला जिल्हा म्हणून औरंगाबाद ओळखला जातो

२) सर्वाधिक क्षमतेचे औष्णिक विद्युत केंद्र म्हणून चंद्रपूर ओळखला जातो

३) आशियातील मोठा पवन ऊर्जा प्रकल्प वनकुसवडे येथे आहे

४) महाराष्ट्रातील पहिला पवन ऊर्जा प्रकल्प पारस येथे आहे

---

१८. भारतात सर्वाधिक दगडी कोळसा उत्पादन कोणत्या राज्यात होते ?

१) झारखंड २) प. बंगाल ३) छत्तीसगड ४) बिहार

---

१९. बांबूपासून कागद निर्मितीची कारखाना महाराष्ट्रात पुढीलपैकी कुठे आहे ?

१) इगतपूरी (नाशिक) २) देसाईगंज (गडचिरोली) ३) कोंढवा (पुणे) ४) भिगवण (पुणे)

---

२०. दार्जिलींग हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या राज्यात आहे ?

१) उत्तराखंड २) आसाम ३) प. बंगाल ४) हिमाचल प्रदेश

---

२१. महाराष्ट्रच्या उत्तर सीमेवर कोणते पर्वत आहे ?

१) सहयाद्री २) अरवली ३) सातपुडा ४) सातमाळा

---

२२. खालीलपैकी कोणते ठिकाण तेलशुध्दीकरण कारखान्यासाठी प्रसिध्द नाही ?

१) कोयाली २) विशाखापट्टणम ३) कोची ४) सिंद्री

---

२३. खालीलपैकी कोणते शहर गोदावरी नदीकाठी वसले नाही ?

१) बीड २) कोपगांव ३) नांदेड ४) गंगाखेडा

---

२४. भारतीय वन व्यवस्थापन संस्था कोठे आहे ?

१) डेहराडून २) अकोला ३) भोपाळ ४) हैद्राबाद

---

www.spandancareers.org

२५. भारतास लाभलेल्या समुद्रकिनाऱ्याचा योग्य असा उपयोग का होत नाही ?

१) खडकाळ समुद्र किनारा २) खोल समुद्र किनारा

३) उथळ समुद्र किनारा ४) दंतूर समुद्र किनारा

२६. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा ?

अ) आर्द्र पानझडीच्या अरण्यात सागवान ही प्रमुख वनस्पती आढळते

ब) 'खाजण' वनस्पतीपासून इंधन उपलब्ध होते

क) महाराष्ट्रात खाडयांच्या दलदलीत प्रदेशामध्ये खाजण अरण्ये आढळतात

ड) मध्य प्रदेशात काटेरी वृक्षांची जंगले आढळतात

१) फक्त अ, ब योग्य २) फक्त ब, क योग्य ३) वरील सर्व योग्य ४) यांपैकी एकही नाही

२७. मँगनीज व कच्चे लोखंड यासाठी खाणकामाचे केंद्र असलेली 'रेडी' हे गाव महाराष्ट्राच्या कोणत्या जिल्हयात येते ?

१) सिंधुदुर्ग २) रत्नागिरी ३) रायगड ४) ठाणे

२८. महाराष्ट्रात विविध फळे पिकविणारा जिल्हा कोणता आहे ?

१) नाशिक २ नगर ३) सातारा ४) रत्नागिरी

२९. योग्य जोडया लावा

| | |
|---|---|
| १) गरमसुर डोंगर | i) गडचिरोली |
| २) दरकेसा टेकडया | ii) नागपूर |
| ३) मुदखेड डोंगर | iii) औरंगाबाद |
| ४) गाळणा डोंगर | iv) गोंदिया |
| ५) भामरागड टेकडया | v) नांदेड |
| | vi) धुळे |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ii | v | iii | iv | i | २) | ii | iv | v | vi | i |
| ३) | iii | iv | ii | v | i | ४) | iv | ii | v | vi | iii |

३०. महाराष्ट्रामधील खालील डोंगररांगाच्या उत्तरेकडून दक्षिणेकडील क्रम लावा.

१) गाळण्याचे डोंगर, सातमाळा रांगा, दंडोबा रांग, चिकोडी रांग

२) चिकोडी रांग, दंडोबा रांग, सातमाळा रांग, गाळण्याचे डोंगर

३) दंडोबा रांग, गाळण्याचे डोंगर, चिकोडी रांग, सातमाळा रांग

४) सातमाळा रांग, दंडोबा रांग, गाळयाचे डोंगर, चिकोडी रांग

३१. योग्य विधान ओळखा

अ) अनुशिलन समितीवर अलीपूर खटला दाखल केला गेला

ब) मेरठ कट खटल्यात समाजवादी विचाराने भारावलेले क्रांतीकारक होते

क) महिलाचा प्रथमच सहभाग असलेला खटला म्हणून नाशिक खटला ओळखला जातो

ड) इ.स. १९१५ च्या लाहोर खटल्यात भगतसिंग यांचा समावेश होतो

१) अ, ब, क, ड योग्य २) अ, ब, क योग्य ३) अ, ब योग्य ४) अ, ब, ड योग्य

३२. लो. टिळकांनी 'केसरी' या वृत्तपत्रात कोणत्या नावाने अग्रलेख लिहिलेले आहेत ?

अ) सरकारचे डोके ठिकाणावर आहेत का ? ब) भ्रमाचा भोपळा फुटला

क) आणीबाणीचा वेळ ड) राज्य करणे म्हणजे सुड घेणे नव्हे

१) अ, ब, क २) ब, क, ड ३) अ, क, ड ४) वरील सर्व

www.spandancareers.org

३३. रहमतअली चौधरीने ‘नाऊ वॉर नेव्हर’ ग्रंथात पाकिस्तानचा उल्लेख करतांना कोणत्या प्रदेशात समावेश केला होता ?

१) पंजाब, बंगाल, आसाम, मध्यप्रांत
२) सहरद्द प्रांत, पंजाब, सिंध, बलुचिस्तान
३) पंजाब, अवध, संयुक्त प्रांत, सिंध
४) सिंध, जम्मु–काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार

३४. बाळ गंगाधर टिळक यांनी डॉ. ॲनी बेझंट यांच्याबरोबर स्थापन केलेल्या होमरूल लीगबाबत काय योग्य नाही ?

१) तिचा उद्देश राष्ट्रीय संघटना वाढविण्याचा आणि त्यांना सशक्त करण्याचा होता
२) ब्रिटीशांनी तिला दडपण्याचे ठरविले वर्तमान पत्रांची मुस्कटदाबी केली
३) मवाळांनी व मुस्लीम लीग पुढाऱ्यांनीही तिच्या कार्यक्रमात भाग घेतला
४) वरीलपैकी एकही नाही

३५. योग्य जोडया ओळखा

अ) ग. वा. जोशी — सार्वजनिक सभा
ब) जगन्नाथ नाना शंकरशेठ — बॉम्बे असोसिएशन
क) दादाभाई नौरोजींनी — ईस्ट इंडिया असोसिएशन
ड) भारतातील पहिली रेल्वे — लॉर्ड डलहौसी

१) अ, ब, क, ड २) अ, ब, क ३) ब, क, ड ४) अ, ब

३६. भारतातील क्रांतीकारकांना बॉम्ब निर्मितीचे तंत्र खालीलपैकी कोणी दिले ?

१) सेनापती बापट, रासबिहारी बोस, प्रफुल्लकुमार चाकी
२) हेमचंद्रदास, उल्हास दत्त, सेनापती बापट
३) उल्हास दत्त, अनंत कान्हेरे, मदनलाल धिंग्रा
४) विष्णू गणेश पिंगळे, गणेश घोष, तारकेश्वर दास्तीगार

३७. योग्य जोडया लावा

१) श्यामजी कृष्ण वर्मा — i) गदर पार्टी
२) आचार्य जावडेकर — ii) इंडिया हाऊस
३) बाबू गेनू — iii) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ
४) उषा मेहता — iv) परदेशी कापडविरोधी चळवळीत हौतात्म्य
v) गुप्त रेडिओ स्टेशन
vi) भूमिगत चळवळीचे नेतृत्व

१) ii iii iv v
२) v iii iv vi
३) vi iii ii i
४) i ii iii iv

३८. भारत छोडो चळवळीबाबत योग्य विधाने ओळखा

अ) इंग्रज राजवट भारताला दुर्बळ बनवित आहे
ब) इंग्रजांची भारतातील उपस्थिती म्हणजे जपानला भारतावर आक्रमण करण्याचे आमंत्रण होते
क) भारताला ईश्वराच्या हाती किंवा अराजकतेत सोडून द्या
ड) या चळवळीत भारतीय जनतेने अहिंसेचे प्रदर्शन जगाला घडविले

१) अ, ब, क योग्य २) अ, ब, क, ड योग्य ३) अ, क, ड योग्य ४) ब, क, ड योग्य

३९. अयोग्य जोडया ओळखा

अ) पंडिता रमाबाई — सेवासदन
ब) रमाबाई रानडे — शारदासदन
क) हुंडा विरोधी कायदा — १९७२
ड) गर्भपात कायदा — १९६१

१) अ, ब, क अयोग्य २) यापैकी एकही नाही ३) अ, ब अयोग्य ४) वरील सर्व अयोग्य

www.spandancareers.org

४०. लो. टिळकांनी कोणत्या कायद्याच्या समर्थनार्थ प्रतियोगी सहकारिता चळवळ सुरू केली ?

१) भारत सरकारचा कायदा २) मोर्ले – मिंटो ३) मॉन्टेग्यु – चेम्सफोर्ड कायदा ४) चार्टर ॲक्ट

४१. इ.स. १९३१ च्या कराच्या अधिवेशनाबाबत योग्य विधाने ओळखा

अ) या अधिवेशनाचे अध्यक्ष – सरदार पटेल होते

ब) या अधिवेशनात मुलभूत हक्काचा ठराव संमत झाला

क) या अधिवेशन काळात सविनय कायदेभंग चळवळ चालू होती

ड) या अधिवेशनात गांधी–आयर्विन कराराला संमती देण्यात आली

१) अ, ब, क योग्य २) ब, क, ड योग्य ३) अ, ब, ड योग्य ४) वरील सर्व योग्य

४२. 'हे स्वराज्य नव्हे आणि त्याचा पाया ही नव्हे' असे १९१९ च्या कायद्याबाबत कोण म्हटले ?

१) लो. टिळक २) दादाभाई नौरोजी ३) महात्मा गांधी ४) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

४३. पत्रीसरकारची स्थापना भारतात कोणत्या ठिकाणी झाली ?

१) सातारा, बालासोर, मिदनापूर, बालिया २) बालिया, सातारा, चितगांव, भिमवरम

३) भागलपूर, भिमवरम, मुजफ्फाराबाद, सातारा ४) बरेली, सातारा, कोल्हापूर, बालिया

४४. खालीलपैकी विधानांचा विचार करून योग्य उत्तरे द्या

अ) जालियनवाला बाग हत्याकांड १३ एप्रिल १९१९ रोजी घडले

ब) जनरल डायरच्या आदेशाने जनतेवर गोळया झाडल्या गेल्या

क) अनंत कान्हेरे यांनी नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांची हत्या केली

ड) अनंत कान्हेरे हे अभिनव भारताचे सदस्य होते. अभिनव भारताची स्थापना वि.दा. सावरकर यांनी केली

१) अ, ब, क योग्य २) फक्त ड योग्य ३) फक्त अ योग्य ४) वरील सर्व योग्य

४५. नेहरू रिपोर्टमध्ये पुढील कोणत्या शिफारशी करण्यात आलेल्या नाहीत ?

अ) एका वर्षानंतर संपूर्ण स्वराज्याची मागणी राहील ब) संघराज्य व प्रांतांना स्वायत्ता

क) राखीव मतदारसंघाऐवजी स्वतंत्र मतदार संघ असावेत ड) भारत धर्मनिरपेक्ष असेल

१) अ, क, ड २) अ, ब, ड ३) ब, क, ड ४) वरील सर्व

४६. जिल्हे आणि त्यांचे निर्मिती साल यांच्या योग्य जोडया लावा

| 'जिल्हा' | 'निर्मिती साल' |
|---|---|
| १) गोंदिया | i) २६ ऑगस्ट १९८२ |
| २) वाशिम | ii) १६ ऑगस्ट १९८२ |
| ३) गडचिरोली | iii) १ मे १९९९ |
| ४) लातूर | iv) १ जुलै १९९८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | iii | iv | ii | i |
| २) | iv | iii | i | ii |
| ३) | iii | iv | i | ii |
| ४) | ii | i | iii | iv |

४७. खालीलपैकी कोण जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख असतो ?

१) अध्यक्ष २) जिल्हाधिकारी ३) मुख्य कार्यकारी अधिकारी ४) मुख्याधिकारी

४८. महानगरपालिकेच्या स्थापनेसाठी कमीत कमी किती लोकसंख्या आवश्यक आहे ?

१) १ लाख २) ३ लाख ३) ४ लाख ४) ५ लाख

www.spandancareers.org

४९. स्वातंत्र्याच्या हक्कानुसार भारतीय नागरिकास भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ नुसार पुढील कोणती स्वातंत्र्ये बहाल केली आहेत ?

अ) भाषण स्वातंत्र्य
ब) शांततेने व विनाशास्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य
क) भारतात मुक्तपणे फिरण्याचे
ड) परदेशात जाण्याचे

१) फक्त अ व ब २) फक्त क व ड ३) फक्त अ, ब व क ४) अ, ब, क, ड

---

५०. खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

अ) भारतातील काही राज्यातच विधानपरिषद अस्तित्वात आहे
ब) विधानपरिषदेतील काही सदस्य नामनिर्देशित असतात
क) विधानपरिषदेतील काही सदस्य प्रत्यक्ष लोकांकडून निवडले जातात

१) अ आणि ब योग्य २) ब आणि क योग्य ३) अ आणि क योग्य ४) अ, ब, क योग्य

---

५१. भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार कायदेमंडळाला घटनादुरूस्तीचा अधिकार प्राप्त झाला आहे ?

१) कलम ३५६ २) कलम ३६६ ३) कलम ३६७ ४) कलम ३६८

---

५२. खालीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ?

अ) नगरपालिकेच्या अध्यक्षास नगराध्यक्ष असे म्हणत नाही
ब) नगराचा अध्यक्ष प्रथम नागरिक असतो
क) नगराध्यक्षाला राजीनामा जिल्हाधिकाऱ्याकडे द्यावा लागतो
ड) नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष हे पदाधिकारी असतात

१) अ व क योग्य २) अ व ब योग्य ३) ब व क योग्य ४) क व ड योग्य

---

५३. ग्रामसभेच्या संदर्भातील चुकीचे विधान निवडा

१) ग्रामसेवक ग्रामपंचायतीचे दैनंदिन नेहमीचे काम पार पाडतात
२) त्यांची निवड राज्य सरकारद्वारे केली जाते
३) ते ग्रामपंचायतीचे सचिव आहेत
४) ते ग्रामपंचायतीची महत्वाची कागदपत्रे व हिशोब सांभाळतात

---

५४. उपराष्ट्रपती विषयी योग्य विधाने ओळखा

अ) उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिध्द सभापती असतात
ब) भारताचे पहिले राज्यसभेचे सभापती डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते
क) उपराष्ट्रपती होण्यासाठी वयोमर्यादा किमान ३० वर्षे असावी
ड) त्यांनी राज्यसभेतून निवडून येण्याची पात्रता असावी

१) फक्त अ आणि क योग्य
२) फक्त अ, ब, क योग्य
३) फक्त अ व ड योग्य
४) वरील सर्व योग्य

---

५५. राज्यपालांच्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

अ) राज्याची कार्यकारी सत्ता राज्यपालांच्या हाती असते
ब) राज्यपालपदासाठी वयाची ३५ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे
क) राज्यपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल पदावर राहू शकतो
ड) राज्यपालास पदावरून बडतर्फ करण्याबाबतची तरतूद राज्यघटनेत केलेली आहे

१) अ, ब, ड योग्य २) अ, ब, क योग्य ३) अ, क, ड योग्य ४) अ, ब, क, ड योग्य

---

५६. जर लोकसभेचे सभापती आणि उपसभापती दोघेही उपस्थित नसतील, तर संसदेच्या संयुक्त बैठकीच्या अध्यक्षस्थानी कोण असतात ?

१) राज्यसभेचे अध्यक्ष
२) राज्यसभेचे उपाध्यक्ष
३) लोकसभेचे सर्वात ज्येष्ठ सभासद
४) राष्ट्रपतींकडून नामनिर्देशित सभासद

---

५७. 'महालक्ष्मी सरस' ही योजना कोणत्या विभागामार्फत राबविली जाते ?

१) कृषी विभाग २) सहकार विभाग ३) नगरविकास विभाग ४) ग्रामविकास विभाग

---

www.spandancareers.org

५८. दोन किंवा अधिक राज्यांसाठी समान उच्च न्यायालय स्थापन करण्याचे अधिकार कोणाला आहे ?

१) संसद २) सर्वोच्च न्यायालय ३) कायदा मंत्री ४) मुख्यमंत्री

५९. माहिती अधिकार कायद्याच्या कोणत्या तरतुदीत माहिती मिळविण्याकरिता मागणी करण्यासंदर्भात उल्लेख केला आहे ?

१) कलम ४ २) कलम ५ ३) कलम ६ ४) वरीलपैकी कोणतेही नाही

६०. मंत्रिपरिषद सामुदायिकपणे ...................... जबाबदार असते

१) राज्य विधानसभेस २) राज्य विधान परिषदेस

३) राज्य विधानसभा व परिषदेस ४) मुख्यमंत्र्यास

६१. खालीलपैकी योग्य विधन /विधाने निवडा

अ) महाराष्ट्राची कृषी संजीवनी योजना ही वीज थकबाकी भरण्याच्या संदर्भात आहे

ब) याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने पाणीपुरवठा संजीवनी योजना सुरू केली. जी पाणीपुरवठा योजनेच्या वीज थकबाकीशी संबंधित आहे

१) अ व ब योग्य २) फक्त अ योग्य ३) फक्त ब योग्य ४) यापैकी एकही नाही

६२. 'प्रधानमंत्री ग्रामसडक योजना – २' या विषयी अयोग्य पर्याय निवडा

१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या आधीच्या टप्प्यात नवीन जोडणीची १००% व रस्ते दर्जोन्नतीची ७५% कामे पूर्ण केलेल्या राज्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग – २ सुरू केली आहे

२) महाराष्ट्रात 'PGSY-२' २०१३ पासून सुरू करण्यात आली

३) ही योजना बिगर आदिवासी क्षेत्रांमध्ये राबविण्यात येत नाही

४) या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून राज्यास २,६२० कि.मी. रस्ते लांबीचे उद्दिष्टे प्राप्त झाले आहे

६३. 'सुकन्या समृध्दी खाते' या योजनेविषयी अयोग्य पर्याय निवडा

१) मुलीच्या जन्मापासून १० वर्षापर्यंत मुलींच्या नावाने बँकेत खाते उघडता येईल

२) हे खाते झिरो बॅलन्स (Zero Balance) चे असेल

३) यात जास्तीत जास्त दीड लाख रूपये रक्कम एका वित्तीय वर्षात जमा करता येईल

४) १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत मुलीच्या खात्यातून पैसे काढता येणार नाहीत

६४. मानव विकास निर्देशांकानुसार ( Human Development Index - 2019) खालील राज्यांचा योग्य उतरता क्रम लावा

अ) दिल्ली ब) केरळ क) गोवा ड) महाराष्ट्र

१) अ, ब, क, ड २) ब, अ, क, ड ३) ब, क, अ, ड ४) ब, क, ड, अ

६५. राष्ट्रीय कृषी विमा योजनेमध्ये ..................... खरीप व ...................... रब्बी पिकांचा समावेश होतो ?

१) १४ व १८ २) १७ व ८ ३) १६ व ९ ४) १६ व ८

६६. योग्य जोडया लावा

| 'सुची – अ' | 'सुची – ब' |
|---|---|
| १) प्राथमिक क्षेत्र | i) सेवा क्षेत्र |
| २) द्वितीय क्षेत्र | ii) कृषी व संलग्न क्षेत्र |
| ३) तृतीय क्षेत्र | iii) उद्योग क्षेत्र |
| ४) चतुर्थक क्षेत्र | iv) उच्च ज्ञानाशी संबंधित व्यवसाय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | ii | iii | i | iv |
| २) | i | ii | iii | iv |
| ३) | ii | iii | iv | i |
| ४) | ii | i | iii | iv |

www.spandancareers.org

६७. खालीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ते ओळखा

अ) जगातील पहिली सौर ऊर्जेवर चालणारी मेट्रो नागपूरमध्ये साकारली जाणार आहे

ब) एकूण ऊर्जा वापराच्या ४०% ऊर्जा सौर ऊर्जोपासून मिळवणार

क) यासाठी भारताने जपानचे सहकार्य घेतले आहे

१) अ व ब योग्य २) ब व क योग्य ३) फक्त अ योग्य ४) वरील सर्व योग्य

६८. भारतातील लोकसंख्येच्या घनतेनुसार खालील राज्यांचा उतरता क्रम लावा

अ) बिहार ब) तामिळनाडू क) केरळ ड) महाराष्ट्र इ) छत्तीसगड

१) अ, ब, क, ड, इ २) क, अ, ब, ड, इ ३) अ, क, ब, ड, इ ४) अ, क, ब, इ, ड

६९. खालीलपैकी कोणत्या प्रकारची बेरोजगारी उत्पादन पूर्ण रोजगार पातळीवर असतानाही उदभवू शकते ?

१) घर्षण बेरोजगारी २) आवर्ती बेरोजगारी

३) रचनात्मक बेरोजगारी ४) वरीलपैकी कोणतीही नाही

७०. महाराष्ट्र राज्यात 'बाल न्याय कायदा' अंमलात आहे त्यानुसार राज्यातील पहिले बाल न्यायालय कुठे स्थापन केले ?

१) रत्नागिरी २) पुणे ३) डहाणू ४) नाशिक

७१. दारिद्रयमापनासाठी 'सुरेश तेंडुलकर समिती'ची स्थापना केव्हा करण्यात आली ?

१) २००८ २) २००९ ३) २०१० ४) २०११

७२. योग्य जोडया लावा

| 'ग्रंथी' (gland) | 'घटक' |
|---|---|
| १) पॅराथायरॉइड ग्रंथी | i) रक्तातील साखरेचे नियंत्रण |
| २) ॲड्रिनल ग्रंथी | ii) शरीराचा BMR समतोल |
| ३) कंठग्रंथी (Thyroid gland) | iii) अस्थि, दात कॅल्शियमयुक्त करणे |
| ४) स्वादूपिंड (Pancreas) | iv) शरीरातील सोडीयमचे प्रमाण नियंत्रित करणे |

१) iii iv ii I २) iv iii ii i

३) iii iv i ii ४) ii iii iv i

७३. 'गॅसोल' (Gashol) हे स्वयंचलीत वाहनांत इंधन म्हणून वापरण्यात येणारे कशाचे मिश्रण आहे ?

१) मिथेन आणि अल्कोहोल २) पेट्रोल आणि अल्कोहोल

३) हायड्रोजन आणि अल्कोहोल ४) नैसर्गिक वायु व अल्कोहोल

७४. साध्या दोलकाबाबतीत (smiple pendulum) खालीलपैकी योग्य विधान ओळखा

अ) ज्या ठिकाणी वस्तुचे वनज कमी जाणवते तिथे दोलकाचे घडयाळ जलद गतीने फिरते

ब) ज्या ठिकाणी तापमान जास्त आहे तिथे दोलकाचे घडयाळ मंद चालते

क) चंद्रावर दोलकाच्या घडयाळाचा दोलनकाल जास्त असतो

१) अ व ब योग्य २) ब व क योग्य ३) अ व क योग्य ४) अ, ब, क योग्य

७५. खालीलपैकी असत्य विधान कोणते ?

१) सोलार सेल उपकरणात प्रकाश ऊर्जेचे विद्युत ऊर्जेत रूपांतरण होते

२) डायनामोमध्ये विद्युत ऊर्जेचे यांत्रिक ऊर्जेत रूपांतर होते

३) कोळशापासून मिळणारी ऊर्जा ही रासायनिक ऊर्जेचे उष्मा ऊर्जेतील रूपांतरण आहे

४) वाजणारी गिटार ही यांत्रिक ऊर्जेत झालेले रूपांतरण आहे

७६. खालील कुठला पदार्थ नेफ्रॉन नलिकेद्वारे स्त्रावले जातात ?

अ) युरीया ब) युरिक आम्ल क) पोटॅशियम आयन ड) हायड्रोजन आयन इ) बायकार्बोनेट

१) अ, ब, क, ड २) अ, ब, ड, इ ३) अ, ब, क, इ ४) अ, ब, क, ड, इ

www.spandancareers.org

७७. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा

अ) पेंग्वीन हा पक्षी उष्ण रक्तीय (warm blooded) आहे

ब) पेंग्वीन या पक्ष्याचे हदय चार कप्प्याचे असते

१) दोन्ही विधान योग्य आणि पहिले विधान दुसऱ्या विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे

२) दोन्ही विधान योग्य आणि दुसरे विधान पहिल्या विधानाचे योग्य स्पष्टीकरण आहे

३) दोन्ही विधान योग्य परंतु कोणतेही विधान कोणाचे योग्य स्पष्टीकरण देत नाही

४) पहिले विधान योग्य दुसरे विधान अयोग्य

---

७८. 'बायोगॅस (Bio-Gas)' जो जनावरांच्या मलमूत्रावर सूक्ष्म जीवांकडून होणाऱ्या किण्वणीकरण (Fermentation) प्रक्रियेने तयार होतो त्यामध्ये खालीलपैकी कोणत्या वायूचे मिश्रण आढळते

१) मिथेन, कार्बन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड

२) मिथेन, $CO_2$, नायट्रोजन, हायट्रोजन सल्फाईड

३) मिथेन, कार्बन मोनोक्साईड, सल्फर हेक्झाफ्लोराईड

४) मिथेन, $CO_2$, ऑक्सीजन, नायट्रोजन, कार्बन मोनॉक्साईड इत्यादी

---

७९. खालील प्राणी विचारात घ्या

| | | |
|---|---|---|
| अ) ऑक्टोपस | ब) झुरूळ | क) खेकडा |
| ड) गांडूळ | इ) गोगलगाय | फ) विंचू |

वरीलपैकी कुठल्या प्राण्यामध्ये खुली रक्तभिसरण (open circulation) संस्था असते ?

१) फक्त अ, ब, क, इ, फ    २) फक्त अ, ब, ड, इ, फ

३) फक्त ब, क, इ, फ    ४) वरील सर्व

---

८०. खालीलपैकी कोणती जोडी अयोग्य आहेत ते ओळखा

अ) द्रव धातू (liqut metal) — पारा

ब) द्रव किरणोत्सारित धातु (Redio active metal) — फ्रान्सियम

क) सर्वात जड धातु — सोने

ड) सर्वात हलका धातु — लिथिअम

१) फक्त ब अयोग्य    २) फक्त ब, ड अयोग्य    ३) फक्त क अयोग्य    ४) वरीलपैकी एकही नाही

---

८१. 'मायोपीया' या डोळयाच्या रोगाबद्दल खालीलपैकी कोणते पर्याय योग्य नाहीत ते ओळखा ?

अ) या रोगात भिंगाची अभिसारी शक्ती (Converging Power) वाढते

ब) बुबुळ (eyeball) लांबट झाल्याने हा रोग होतो

क) या आजारानी त्रस्त व्यक्तीचा चष्मा ऋण शक्तिचा असतो

१) फक्त अ, ब    २) फक्त ब, क    ३) फक्त अ, क    ४) वरीलपैकी एकही नाही

---

८२. योग्य जोडया लावा

| 'पीक' | 'रोग' |
|---|---|
| १) बाजरी | i) बंची टॉप |
| २) तांदूळ | ii) तांबेरा |
| ३) गहू | iii) अरगट |
| ४) केळी | iv) लीफ स्पॉट |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | i | iv | ii | iii |
| २) | iii | i | ii | iv |
| ३) | iii | iv | ii | i |
| ४) | iii | iv | i | ii |

८३. कोणत्या देशातील संशोधकांनी प्राण्यांच्या आत जिवंत पेशीच्या क्रिया नियंत्रित करण्यासाठी स्मार्टफोन वापरले आहे ?

१) जपान　२) चीन　३) अमेरिका　४) ब्रिटन

---

८४. दक्षता जागृती सप्ताहाबाबत खालीलपैकी कोणती/ती विधान/ने चुकीचे आहे/त ?

अ) केंद्रीय दक्षता आयोगातर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती ज्या आठवडयात येते त्या आठवडयात दरवर्षी हा सप्ताह साजरा करण्यात येतो

ब) या सप्ताहाची २०२१ ची संकल्पना सतर्क भारत, समृध्द भारत अशी आहे

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ　२) फक्त ब　३) दोन्ही अ व ब　४) दोन्ही अ व ब नाही

---

८५. "आझादी का अमृत महोत्सव" बाबत खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

अ) भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षपूर्ती निमित्त पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली "आझादी का अमृत महोत्सव राष्ट्रीय समिती" स्थापन करण्यात आली

ब) या समितीमध्ये २६० सदस्य आहेत

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ　२) फक्त ब　३) दोन्ही अ व ब　४) दोन्ही अ व ब नाही

---

८६. भारतीय संसदीय प्रणालीत विरोधी पक्ष नेत्याबाबत खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ) भारतीय संसदीय प्रणालीत विरोधी पक्षनेते पदाला वैधानिक दर्जा आहे

ब) भारतीय संविधानात कोठेही विरोधी पक्षनेते पदाची व्याख्या करण्यात आलेली नाही

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ　२) फक्त ब　३) दोन्ही अ व ब　४) दोन्ही अ व ब नाही

---

८७. १०३ वी घटना दुरूस्ती कायदा खालील कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

अ) यानुसार साधारण प्रवर्गातील आर्थिकरित्या मागास वर्गाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्यात आले आहे

ब) या घटनादुरूस्ती कायद्याने संविधानाच्या १६ आणि १७ व्या कलमात बदल करण्यात आले आहेत

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ　२) फक्त ब　३) दोन्ही अ व ब　४) दोन्ही अ व ब नाही

---

८८. खालीलपैकी कोणाच्या अध्यक्षतेखाली मे २०२० मध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाने फौजदारी कायदा समिती गठीत केली होती ?

१) प्रा. रणबीर सिंग　२) जी.एस.बाजपेयी　३) म्रीणाल सतीश　४) महेश जेठमलानी

---

८९. 'मुंबई समाचार' बाबत खालील पैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त ?

अ) १ जुलै २०२१ रोजी या वृत्तपत्राने २०० व्या वर्षात पदार्पण केले

ब) १८२२ मध्ये फार्दुनजी मुराझाबन यांनी या वृत्तपत्राची स्थापना केली होती

क) हे मराठीत प्रकाशित होणारे वृत्त पत्र आहे

ड) सुरूवातीला हे 'बॉम्बे समाचार' नावाने साप्ताहिक स्वरूपात प्रकाशित केल जाते होते

पर्याय

१) अ, ब व क　२) ब, क व ड　३) अ, ब व ड　४) अ, क व ड

---

९०. राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली सरकार (दुरूस्ती) विधेयक २०२१ बाबतीत खालील पैकी कोणते/ती विधान बरोबर आहे/त ?

अ) दिल्ली विधानसभेने केलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये 'सरकार (Governement) या शब्दाचा अर्थ 'लेफ्टनंट गव्हर्नर' असा करण्यात आला आहे

ब) दिल्ली विधानसभेने मंजूर केलेली काही विषयांसंबंधी विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठविणे बंधनकारक करण्यात आले आहे

१) फक्त अ　२) फक्त ब　३) दोन्ही अ व ब　४) दोन्ही अ व ब नाही

---



www.spandancareers.org

९१. खाजगी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याच्या बाबतीत खालीलपैकी कोणते/ती विधाने बरोबर आहे/त?

अ) झारखंड सरकारने ५० रूपयांपेक्षा कमी मासिक वेतन असणाऱ्या खाजगी नोकऱ्यांमध्ये स्थानिकासाठी ७५% आरक्षणाला मान्यता दिली आहे

ब) स्थानिकांना खाजगी नोकऱ्यात आरक्षण देणारे हरीयाना हे देशातील पहिले राज्य आहे

१) फक्त अ   २) फक्त ब   ३) दोन्ही अ व ब   ४) दोन्ही अ व ब नाही

---

९२. १०४ वी घटनादुरूस्ती अधिनियम २०१९ बाबत खालीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

अ) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे लोकसभा आणि विधानसभेतील आरक्षणाची मुदत २५ जानेवारी २०४० पर्यंत करण्यात आली आहे

ब) ऑग्ल भारतीय समुदायाला देण्यात आलेल्या आरक्षणाची मुदत २५ जानेवारी २०४० पर्यंत करण्यात आली आहे

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ   २) फक्त ब   ३) दोन्ही अ व ब   ४) दोन्ही अ व ब नाही

---

९३. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील खालीलपैकी कोणते कलम सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केले आहे ?

१) कलम ६६   २) कलम ६६ ए   ३) कलम ६६ बी   ४) कलम ६६ सी

---

९४. महान्यायवादी पदाबाबत खालीलपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे/त

अ) के के वेणुगोपाल यांची नियुक्ती महान्यायवादीपदी (Attorney General) करण्यात आली आहे

ब) राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते पदावर राहू शकतात

क) त्यांना खाजगी प्रॅक्टीस करता येते

पर्यायी

१) अ व ब   २) ब व क   ३) अ व क   ४) अ, ब व क

---

९५. खालीलपैकी अयोग्य विधाने दर्शवणारा/रे योग्य पर्याय निवडा

अ) राज्यघटनेच्या अनुच्छेद ७७ अन्वये पंतप्रधानांनी नव्या सहकार मंत्रालयाची स्थापना केली

ब) नव्या सहकार मंत्रालयाचा कार्यभार अमित शाह यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ   २) फक्त ब   ३) दोन्ही अ व ब   ४) दोन्ही अ व ब नाही

---

९६. FASTER डिजिटल प्रणाली खालीलपैकी कोणत्या संस्थेने सुरू केली आहे ?

१) पंतप्रधान कार्यालय   २) लोकसभा   ३) गृह मंत्रालय   ४) सर्वोच्च न्यायालय

---

९७. मराठा आरक्षण रद्द करण्याबाबतचा निर्णय देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचे अध्यक्ष कोण होते ?

१) न्या. अशोक भूषण   २) न्या. एन. व्ही. रामन्ना   ३) न्या. धनंजय चंद्रचूड   ४) न्या. शरद बोबडे

---

९८. योग्य पर्याय निवडा ?

अ) CBI च्या संचालकपदी सुबोध कुमार जयस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली

ब) सुबोध कुमार हे महारष्ट्र केडरचे तिसरे IPS अधिकारी ठरले आहे

१) फक्त अ   २) फक्त ब   ३) दोन्ही अ व ब   ४) दोन्ही अ व ब नाही

---

९९. नुकतेच निधन पावलेले सोली सोराबजी यांची काय म्हणून ओळख होती ?

१) पर्यावरण संरक्षणवादी   २) जैवतंत्र शास्त्रज्ञ   ३) मानवी हक्कवादी व कायदेतज्ञ   ४) माजी संरक्षण प्रमुख

---

१००. भारताचा ६८ वा बुध्दिबळ ग्रॅन्डमास्टर कोण ठरला आहे ?

१) अर्जुन कल्याण   २) रामानुजन स्वामी   ३) किती पटेल   ४) विकास रेड्डी

---

www.spandancareers.org